**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- १०**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :- १४/०९/२०१०

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **सभा क्र. १० शनिवार दि. १८/०९/२०१० रोजी दुपारी १-०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये
अहमदनगर महानगरपालिका.

**शनिवार दिनांक- १८/०९/२०१० ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ६३ | अहमदनगर महानगरपालिकेस सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षाकरिता लोखंडी कचरा ढकलगाडी, तीन चाकी सायकल रिक्षा, फायबर युरिनल,फुटपाथ, लिटरबीन, १० सीटचे फिरते शौचालय इत्यादी खरेदी, कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| ६४ | अहमदनगर महानगरपालिकेच्या जुन्या वाहनांची मा. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी काढून दिलेल्या किंमती प्रमाणे जुन्या वाहनांची जाहिर लिलावाद्वारे विक्री करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ६५ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बा.दे. दवाखाना व सुतिका गृह येथे डॉ. दिपाली अनुभले (शेळके) यांची दिनांक ९/८/२०१० पासून तीन महिन्याचे कालावधीकरिता दरमहा रूपये १५,०००/- चे मानधनावर वैद्यकीय अधिकारी म्हणून कंत्राटी, करारानुसार केलेल्या नेमणूकीस कार्यात्तर मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ६६ | अहमदनगर महानगरपिालका हद्दीमध्ये आयात होणा-या जकातपात्र मालावर सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षाचे कालावधीसाठी जकात वसुली अभिकर्ता नेमणुकीसाठी मागविण्यात आलेल्या जास्तीचे निविदाकार यांनी वाटाघाटीअंती वाढवुन दिलेल्या निविदा दरास मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**सोबत**- १] विषय-क्रमांक- ६३ ते ६६ च्या प्रस्तावाच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-१०**

विषय क्रमांक - ६३ शनिवार दिनांक १८/९/२०१०

ठराव क्रमांक - ६३ शनिवार दिनांक १८/९/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेस सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षाकरीता लोखंडी कचरा ढकलगाडी, तीन चाकी सायकल रिक्षा, फायबर युरिनल, फुटपाथ, लिटरबीन, १० सीटचे फिरते शौचालय इत्यादी खरेदी कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. स्टोअर विभाग- दिनांक- ०४/०९/२०१०
प्रेषक- स्टोअर विभाग प्रमुख , प्रति- मा.नगरसचिव

विषय-अहमदनगर महानगरपालिकेस सन २०१०-११या आर्थिक वर्षाकरिता लोखंडी कचरा ढकलगाडी, तीन चाकी सायकल रिक्षा, फायबर युरिनल, फुटपाथ लिटर बिन, १० सीटचे फिरते शौचालय इ. पुरवठा वार्षिक निविदा दर मंजुरीबाबत.

सादर,

उपरोक्त विषयास अनुसरून विनंती रिपोर्ट की, अहमदनगर महानगरपालिकेस सन २०१०-११ या आर्थिक वर्षाकरिता लोखंडी कचरा ढकलगाडी, तीन चाकी सायकल रिक्षा, फायबर युरिनल, फुटपाथ लिटर बिन, १० सीटचे फिरते शौचालय इ. खरेदीकामी वार्षिक फेर निविदा मागविल्या असता मुदतीत-

१) मे.एस.एस. एन्टरप्राईजेस, नाशिक
२) मे. तिरूपती रिक्षा ट्रेडर्स, नागपूर
३) मे. गणेश फेब्रीकेशन वर्क्स, नाशिक
४) मे. अजिल फायबरटेक, पुणे

यांप्रमाणे चार निविदा प्राप्त झालेल्या असून सदर निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता पाहता-

**बाब नं. १**

अ.क्र.-५ चा दर मे. तिरूपती रिक्षा ट्रेडर्स, नागपूर यांनी एकटयानेच दिलेला असल्याने स्पर्धात्मकदृष्टया तुलना करता येत नाही.

**बाब नं.२**

अ.क्र.- १ व ६ चे दर मे. तिरूपती रिक्षा ट्रेडर्स, नागपूर यांचे,
अ.क्र.- ३ चा दर मे. गणेश फेब्रीकेशन वर्क्स, नाशिक यांचा व
अ.क्र.- २,४ व ७ चे दर मे. अजिल फायबरटेक, पुणे यांचे स्पर्धात्मकदृष्टया सर्वात कमी आहे.

मे. तिरूपती रिक्षा ट्रेडर्स, नागपूर, मे. गणेश फेब्रीकेशन वर्क्स, नाशिक व मे. अजिल फायबरटेक, पुणे यांना निविदेतील स्पर्धात्मकदृष्टया सर्वात कमीचे दराबाबत दि.०५/०६/२०१० रोजी निविदा दर निगोसिएशनसाठी बोलविले असता त्यांनी समक्ष उपस्थित राहून निविदा दर निगोसिएशन नंतर दिलेले अंतिम दर निविदा दराच्या तुलनात्मक तक्त्यातील कॉलम क्र.९ मध्ये नमुद केलेले असून त्याची माहिती पुढीलप्रमाणे-

**निविदाकार- मे. तिरूपती रिक्षा ट्रेडर्स, नागपूर**

| टेंडर यादी क्र. | मालाचा तपशील | निगोसिएशन नंतर दिलेला अंतिम दर |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | लोखंडी कचरा ढकलगाडी-<br>साईज-लांबी 36", रूंदी 24", खोली 12", एकूण गाडीची उंची 25" (जमिनीपासून), एकूण गाडीची लांबी (हँडलसह)52", चाकाची साईज-12" चाकासाठी 1"x1" साईजचा चौरस भरीव बार, बॉडी अँगल फ्रेम 25x25x2-18 गेज गॅल्व्हनाईज पत्रा लावून संपुर्ण ढकलगाडी ऑईलपेंटने रंगवून पूर्ण दोन्ही बाजूस<br>'अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर ' नाव टाकलेली | रू.३,६००=०० प्रति १ नग |
| ६ | Foot path Litter bin Double piller- 4.5 CET.<br>Specification- CRCA Pressed sheet 1.25 mm Thickness<br>Base Frame- 35x35x3mm Rolled Angle.<br>Pole- SQ Pipe 50x50x2mm m.s<br>Abv-Board-Size 450mm x300 mm of 1.25mm C.R. Sheet<br>Capacitty- 4.5 CFT.<br>Painting- painted after Hot anti corrosive Treatment with oven baked primed & painted.<br>वरील लिटर बिन पिवळया रंगाच्या व त्यावर 'अहमदनगर महानगरपालिका माझा वापर करा' असे काळया रंगाने रंगवून पूर्ण करून स्टँड सिमेंट कॉंक्रिटमध्ये उभे करून देणेसह | रू. ४,५४५=०० प्रति १ नग |

**निविदाकार- मे. गणेश फेब्रीकेशन वर्क्स, नाशिक**

| | | |
|---|---|---|
| ३ | FRP Urinal- Double seats for Gents without door- Size-4' x 6' feet, Height 7'6" feet<br>FRP panel will be 40mm thick sandwich type 6mm panels on both side finish Base Frame will be mounted in 50x5 mm angles. | रू. ५५,२२२=५० प्रति १ नग |

**निविदाकार- मे. अजिल फायबरटेक, पुणे**

| | | |
|---|---|---|
| २ | FRP Urinal-Single seats for Gents without door- Size-4'x3' feet, Height 7'6" feet<br>FRP Panel will be 40 mm thick sandwich type 6mm panels on both side finish Base Frame will be mounted in 50x5 mm angles. | रू. २८,०००=०० प्रति १ नग |
| ४ | FRP Urinal-Single seats for Ladies with door- Size-4'x3' feet, Height 7'6" feet<br>FRP Panel will be 40 mm thick sandwich type 6mm panels on both side finish Base Frame will be mounted in 50x5 mm angles. | रू. २७,०००=०० प्रति १ नग |
| 7 | चारचाकी चासीवर आर.टी.ओ. नियमानुसार 10 सीटचे फिरते शौचालय 20 मि.मी. जाडीच्या पॅनेलवर 1.5 मि.मी. जाडीच्या फायबर ग्लासमध्ये तपशीलाप्रमाणे बांधणी करून पुरवठा करणे. | रू. ३,९९,०००=०० प्रति १ नग |

सदर निविदाबाबत स्टोअर विभाग दि.२२/०६/२०१०चे प्रस्तावावर मा.आयुक्त,मा.उपायुक्त (कर),मा.मुख्यलेखाधिकारी, मा.मुख्यलेखापरिक्षक,मा.वैद्यकीयआरोग्य अधिकारी व मा.अभियंता- घनकचरा व्यवस्थापन विभाग यांनी अभिप्रायासह स्वाक्षरी केलेली आहे.

तरी उपरोक्त बाब नं.१४ मधील अ.क्र. ५ तीन चाकी सायकल रिक्षा जरूरीप्रमाणे बाजारातून कोटेशन दरपत्रके मागवून अथवा अल्प मुदतीची निविदा मागवून खरेदीस व बाब नं.२ मधील अ.क्र. १ व ६ चे मे. तिरूपती रिक्षा ट्रेडर्स, नागपुर, अ.क्र. ३ चा मे. गणेश फेब्रीकशन वर्क्स , नाशिक व अ.क्र. २,४ व ७ चे मे. अजिल फायबरटेक, पुणे यांचे उपरोक्त तक्त्यातील दर मंजूरीबाबत तसेच नामंजूर निविदाकार यांची निविदा बयाणा रक्कम त्यांना परत करणेस मंजुरी मिळावी ही विनंती.

सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेपुढे निर्णयास्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे स्टोअर विभाग प्रमुख करिता श्री. जाधव ए.जी. यांचा अहवाल असे. दि.०४/०९/१०

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- सन २०१०-२०११आर्थिक वर्षासाठी लोखंडी कचरा ढकलगाडी,तीन चाकी सायकल रिक्षा, फायबर युरिनल,फुटपाथ,लिटरबीन, इत्यादी खरेदी कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दरास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. पवार बा.रे. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

मा.सहाय्यक आयुक्त श्री. देशमुख साहेब :- सायकल रिक्षा मागील दोन वर्षापासून खरेदी करण्यांत येत नाहीत. तेव्हा ऑफिस रिपोर्ट मधील शेवटचा भाग वाचावा.

स्टोअर विभाग प्रमुख श्री. जाधव ए.जी. :- तीन चाकी सायकल रिक्षा जरूरीप्रमाणे बाजारातुन कोटेशन दरपत्रके मागवून अथवा अल्पमुदतीची निविदा मागवून खरेदीस व बाब नं.२ मधील अ.क्र. १ व ६ चे मे. तिरूपती रिक्षा ट्रेडर्स, नागपुर अ.क्र. ३ चा मे. गणेश फेब्रीकेशन वर्क्स नाशिक व अ.क्र. २,४ व ७ चे मे. अजिल फायबर टेक पुणे यांचे उपरोक्त तक्त्यातील दर मंजुरी बाबत तसेच नामंजूर निविदाकार यांची निविदा बयाणा रक्कम त्यांना परत करणेस मंजूरी मिळणेस सदर प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेपुढे निर्णयास्तव सादर.

मा.श्री.पवार बा.रे. :- मध्यतरी अहमदनगर शहरामध्ये झालेल्या महिला बचत गट व औद्योगिक प्रदर्शनामध्ये कचरा ढकलगाडी इत्यादी साहित्याची पहाणी महानगरपालिका अधिकारी वर्गाने केली होती तेव्हा तेथील कमी किंमती चे साहित्याची खरेदी करणेबाबत चर्चा झाली होती परंतु सदरचा प्रस्ताव पहाता सदर वस्तुचे आलेले दर हे जास्तीचे वाटतात.

अं.लेखापरिक्षक श्री.खरात वि.स. :- वस्तुचे फ्रॅब्रीकेशन, डिझाईन व तांत्रिक स्पेशिफिकेशन इत्यादीमधील फरकामुळे किंमती जादा वाटतात.

स्टोअर विभाग प्रमुख श्री. जाधव ए.जी.:- मागणीनुसार खरेदी करणेत येईल आता फक्त दर मंजूर करणे आहेत.

मा.श्री.पवार बा.रे.:- वॉर्डमधील विदयुतीकरण,ड्रेनेज दुरूस्ती इत्यादीचे आवश्यक अशा किरकोळ कामांसाठी मटेरीअल साहित्य इत्यादी मिळणेसाठी मागणी करूनही वेळेवर कुठलेच मटेरिअल मिळत नाही. सप्लायर्सची बीले दिलेली नसल्याने सप्लायर मालाचा पुरवठा करित नाहीत असे सांगण्यात येते ड्रेनेज चेंबर वरील झाकणे स्लॅब, इले. टयुब, बांधकाम, मटेरिअल इत्यादी साहित्याची मागणी पूर्वीच केलेली आहे. परंतु मटेरिअल मिळत नाही.

मा.सभापती साहेब :- ड्रेनेज वरील झाकणे मागणी करूनही मिळत नाहीत.

स्टोअर विभाग प्रमुख श्री. जाधव ए.जी. :- दर मंजूरी नसलेने खरेदी करणेत आलेली नाही.

मा.श्री.बारस्कर पो.ज. :- मा.स्थायी समितीने केलेल्या ठरावाप्रमाणे प्रत्येक वॉर्डमधील इले.चे कामांसाठी सम प्रमाणात इलेक्ट्रीक साहित्यासाठी खर्च करावा असे ठरले होते. त्याप्रमाणे काय कार्यवाही केली आहे. मा.स्थायी समितीचे ठरावाप्रमाणे कार्यवाही झाला पाहिजे.

इले. विभाग प्रमुख श्री. सावळे :- वॉर्डामधील कामांसाठी आलेल्या मागणी प्रमाणे इले. साहित्य खरेदी कामी प्रस्ताव तयार करून मंजूरीसाठी सादर केला असता आदेशानुसार त्यापैकी काही मटेरिअलचे खरेदी साठी मिळालेल्या मंजूरी नुसार इलेक्ट्रीक साहित्य स्टोअरमार्फत प्राप्त झाले होते. मागणीनुसार वॉर्ड मधील कामांसाठी वापरलेले मटेरिअल चे रेकॉर्ड ठेवलेले असून ते आपण केव्हाही पाहू शकता.

मा.श्री.पवार बा.रे. :- माझे वॉर्डमध्ये मी स्वतः इले. टयुब खरेदी करून वॉर्ड मधील आवश्यकते नुसार कामासाठी त्या वापरास दिलेल्या आहेत.अंधारामुळे अपघात झालेनंतर मटेरिअलची खरेदी करणार का ? मागणी करूनही आवश्यक साहित्य मिळत नाही. सप्लायर्सची बीले पेड न केल्यामुळे मटेरिअल पुरवठा होत नसलेचे सांगितले जाते.दोन दोन वर्षे मटेरिअल मिळत नाही.

मा.श्री. बारस्कर पो.ज.:- मागणी करूनही आवश्यक मटेरिअल मिळत नाही मा. स्थायी समितीने मंजूर केलेला ठरावाप्रमाणे सर्व प्रभागामध्यें सम प्रमाणात इले. साहित्यासाठी खर्च करण्यांत यावा.

स्टोअर विभाग प्रमुख श्री. जाधव ए.जी. :- इलेक्ट्रीक साहित्याची मागणी क्रमांक ११२ ते ११३ दिनांक २७/७/२०१० अन्वये केलेली असून दिनांक ११/८/२०१० रोजी इले. विभागास दिलेल्या साहित्याची व पुरवठादाराकडून इले. साहित्य येणे बाकी असलेबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

| मालाचा तपशील | एकूण | दि.११/८/१०रोजी इलेक्ट्रीक विभागास पुरवठा | पुरवठादाराकडून माल येणे बाकी |
|---|---|---|---|
| १) ४० वॅट टयुब बार | ४००० | १५०० | २५०० |
| २) ४० वॅट टयुब स्टार्टर | ४००० | २००० | २००० |
| ३) टयुब लॉक होल्डर | ३००० | १००० | २००० |
| ४) टयुब कॉपर चोक | ५०० | ३८४ | ११६ |
| ५) टयुब इलेक्ट्रॉनिक्स चोक | ५०० | १८० | ३२० |
| ६) १५० वॅट सोडीयम दिवे | ५०० | २०० | ३०० |
| ७) १५० वॅट सोडीयम चोक | २०० | ५० | १५० |
| ८) १५० वॅट सोडीयम इग्नेटर | ४०० | ४०० | - |
| ९) सी.एफ.एल.बल्ब | ५०० | २०० | ३०० |
| १०) टयुब पट्टी क्प्लींट | ५० | - | ५० |
| ११) टेप बंडल | ५०० | ५०० | - |
| १२) सिलींग फॅन-५६" | १० | - | १० |
| १३) १५० वॅट बल्ब थ्रेड व्होल्डर | १५० | | १५० |

मा.श्री. भोसले ग.पुं. :- इले.च्योकची मागणी करावी आपतकालीन परिस्थीती मध्ये तातडीने कार्यवाही करणेसाठी यंत्रणा असावी.ज्या वॉर्ड मध्ये मटेरिअलचा वापर केला आहे. त्या वॉर्ड चे नगरसेवक यांची त्याबाबत स्वाक्षरी घेण्यांत यावी. म्हणजे संबंधीत नगरसेवकाला ही मटेरिअल वापरलेची माहिती होईल.

मा.श्री. पवार द.ज. :- प्रभागामध्ये वापरलेल्या मटेरिअल बाबत संबंधीत नगरसेवकांच्या सहया घेण्यांत याव्यात.

मा.उपायुक्त श्री. डोईफोडे साहेब :- आवश्यकते नुसार इलेक्ट्रीक साहित्याची अर्जंट खरेदी तातडीने करण्यांत यावी. मा. सदस्यांकडून मागणी नोंदवून तातडीने कार्यवाही करावी.

मा.सौ.ढोणे मा.सु.:- वायरमन कमी असलस ते वाढवून घेण्यांत यावेत.

इले. विभाग प्रमुख श्री. सावळे :- आपले कडे चौदा वायरमन कायम असून कंत्राटी पध्दतीने १० वायरमनची नेमणूक केलेली असून प्रत्येक प्रभागातील कार्यालयामध्ये वायरमनची नेमणूक केलेला आहे.

मा.सौ. ढोणे मा.सु. :- आवश्यक कामाचे वेळी कुणीही उपलब्ध होत नाहीत. कुणी रजेवर असतात कुणी जादा काम असल्याचे सांगतात.

इले. विभाग प्रमुख श्री. सावळे :- प्रत्येक प्रभाग कार्यालयामध्ये वायरमनची नेमणूक केलेली आहे.

मा.श्री. पवार बा.रे. **व** मा.श्री. बारस्कर पो.ज. :- सावेडी भागाकरिता फिरते शौचालय तसेच युरिनलची खरेदी तातडीने करण्यांत यावी.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. पवार बा.रे. :- मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेस सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षाकरीता लोखंडी कचरा ढकलगाडी, तीन चाकी सायकल रिक्षा, फायबर युरिनल, फुटपाथ, लिटरबीन, १० सीटचे फिरते शौचालय इत्यादी खरेदी कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता स्पर्धात्मक दृष्टया कमीचे निविदा दर धारक मे. तिरूपती रिक्षा ट्रेडर्स, नागपुर, मे. गणेश फेब्रीकेशन वर्क्स, नाशिक व मे. अजिल फायबरटेक, पुणे यांनी वाटाघाटी अंती कमी करून दिलेल्या कमीचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे. तसेच नामंजूर निविदाकार यांची निविदा बयाना त्यांना परत करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-१०**

विषय क्रमांक - ६४ शनिवार दिनांक १८/९/२०१०

ठराव क्रमांक - ६४ शनिवार दिनांक १८/९/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या जुन्या वाहनांची मा.उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी काढुन दिलेल्या किंमती प्रमाणे जुन्या वाहनांची जाहिर लिलावाद्वारे विक्री करणेस मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. मोटार व्हेईकल विभाग दिनांक ६/०२/१०

विषय :-म.न.पा. मालकीचे विविध विभागाकडे देण्यात आलेल्या वाहनापैकी लिलावकरीता काढण्यात आलेल्या वाहनाचे रजिस्ट्रेशन पुस्तके मा. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, अ.नगर कार्यालयाकडून घेणेकामी व त्याकरीता येणारे खर्चास मंजुरीस्तव.

संदर्भ :- १] मो.व्हे. विभाग जा.क्र. ३१६ दि.३०/१/१० व

२]मा.उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे दि. ६/२/१० ची वाहनाची समक्ष पहाणी.

सादर,

उपरोक्त विषयासंदर्भानुसार विनंती रिपोर्ट मो.व्हे. विभागाकडून करण्यात येतो की, संदर्भीय पत्र अ.क्र. १ अन्वये मा.उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी गॅरेज येथे संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये देण्यांत आलेल्या यादीनुसार वाहनाची तपासणी केली असता व सदरच्या वाहनाचे रजिस्ट्रेशन (नोंदणी) पुस्तके ची जरूरी भासली असल्याने सदरच्या नोंदणी पुस्तके याची कार्यालयात सर्व कर्मचारी यांनी शोधाशोध केली असता उपलब्ध झाले नाही.

सबब खालील तक्तातमध्ये दर्शविलेले वाहनाचे नोंदणी पुस्तके मा. उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, अहमदनगर यांचे कडून डुप्लीकेट काढून घेणे जरूरीचे असल्याने सदरचे पुस्तके घेणेकामी येणार खर्चास व कामास मंजुरीस्तव सविनिय सादर.

| अ.क्र. | वाहन क्रमांक | मॉडेल | खरेदी दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | DMR 2040 | टाटा १२१० | | रजिस्ट्रेशन केले नाही. |
| २ | MH 16 N-1111 | इंडिगो | १२/११/०३ | |
| ३ | MH 16 N-101 | एस्टीम | २२/११/९९ | |
| ४ | MH 16 E-2424 | एस्टीम | ११/६/९७ | |
| ५ | MH 16N-24 | ॲम्बेसिडर | १७/५/९९ | |
| ६ | जे.सी.बी. | एस्कॉर्ट | ५/५/२००० | |
| ७ | सेप्टीक टँक | | | रजिस्ट्रेशन केले नाही |

तरी वरील तक्तात मध्ये नमुद केलेल्या अ.क्र. १ ते ६ पैकी अ.क्र. ४ चे पुस्तक कार्यालयात उपलब्ध आहे. उपरोक्त अ.क्र. २,३ व ५,६ चे पुस्तके मा. उपप्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत डुप्लीकेट मिळणे कामी मंजुरीस्तव सविनिय सादर.

येणे प्रमाणे मोटार व्हेईकल विभाग प्रमुख यांचा अहवाल असे. दि.६/२/१०

मॅकेनिकल इंजि.:- मो. व्हे. क्लार्क वाहनांची कागदपत्रे कशी हरवतात ? शोधून कागदपत्रे सादर करावीत. दि.८/२/२०१०

--**--

अहमदनगर महानगरपालिका
मोटार व्हेईकल विभाग
दिनांक १३/०८/२०१०

विषय- महानगरपालिकेच्या जुन्या वाहनांचे लिलावाद्वारे विक्री करण्या कामी सरकारी किंमत काढून मिळणेबाबत.

संदर्भ :- उपप्रादेशिक परिवहन कार्यालय जा.क्र. २१४६ दि. ७/८/२०१० चे पत्र

सादर,

उपरोक्त विषया संदर्भानुसार विनंती रिपोर्ट देण्यांत येतो की, विषयांकित बाबत या विभागामार्फत उप प्रादेशिक परिवहन विभाग कार्यालय जा.क्र.३१६ दि.३०/१/२०१० अन्वये एकूण सात वाहनाचे सरकारी किंमत काढून मिळणेबाबत कळविले होते.

सदरच्या पत्रास अनुसरून उपप्रादेशिक परिवहन कार्यालयामधील परिवहन निरिक्षक यांनी मोटार गॅरेज येथे दि.२२/७/२०१० रोजी समक्ष येवुन विषयांकित वाहनेची तपासणी करून संदर्भिय पत्रा अन्वये वाहनाचे सरकारी किंमत संदर्भिय पत्रान्वये कळविण्यांत आली आहे.

परंतु महानगरपालिकेमार्फत पाठविण्यात आलेल्या मो.व्हे.जा.क्र.३१६ दि.३०/१/२०१०च्या पत्रातील नमूद केलेल्या वाहन तपशील तक्त्यातील अ.क्र. १ व अ.क्र.७ चे महानगरपालिकेमार्फत उपप्रादेशिक परिवहन विभागाकडे नोंदणी न केल्यामुळे सरकारी किंमत काढण्यात आलेली नाही.

सदरच्या वाहन तपशील तक्यातील किंमत न काढलेल्या वाहनाबाबत महानगरपालिका आपल्या स्तरावर निर्णय घेवु शकते असे चर्चा करते वेळेस उपप्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत समक्ष सांगण्यात आले आहे.

विषयांकित वाहन तपशील मधील अ.क्र.१ च्या वाहनाचे हिस्ट्री रजिस्टर पाहता आजमितीस सदरच्या वाहनावर रू.४,३७,७५३/- इतका रिपेअर दुरूस्ती खर्च झालेला आहे व सदरचे वाहन हे सन १९९४ चे खरेदी चे असल्याने बाजारात सध्या जुन्या वाहनाच्या असलेल्या प्रचलित दरानुसार अंदाजे किंमत २.५० ते ३.०० लाख व अ.क्र. ७ वरील वाहनाबाबत यापूर्वीचे झालेल्या जुन्या लिलाव मध्ये रू.२५०००/- ठेवण्यात आले असताना सुध्दा सदरचे वाहन विक्री झालेले नाही.

सबब सदरचे वाहनांची मागील वेळेचा अनुभव लक्षात घेता रू.१८०००/-ते २००००/- ठेवल्यास वाहन विक्री होण्याची शक्यता आहे.

तरी वरील दोन वाहनांचे काढलेल्या अंदाजे किंमतीस व कामास पुढील योग्य त्या आदेशार्थ व अवलोकनार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे मोटार व्हेईकल क्लार्क यांचा अहवाल असे.

H.C.मोटार व्हेईकल विभाग :- मो.व्हे. क्लार्क यांचे रिपोर्टानुसार आदेशार्थ सादर.

मॅके.इंजि.:- मनपाच्या जुन्या वाहनांचे लिलावाद्वारे विक्री करणेकामी सरकारी किंमत काढून मिळणेबाबत, मा. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी,अ.नगर यांचेकडेस पत्रव्यवहार केला असता, त्यांनी संदर्भिय पत्रान्वये वाहनांच्या किंमती इकडेस कळविल्या आहेत.

तरी मा. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी पत्रात कळविल्याप्रमाणे वाहनांच्या किंमती प्रमाण मानून त्या वाहनांची जाहिर लिलावाद्वारे विक्री करणे योग्य वाटते. तथापी आदेशार्थ सादर. दि.२३/८/१०

मुख्यलेखापरिक्षक :-उप प्रादेशिक परिवहन अधिकारी ,अहमदनगर यांचे दि.७/८/१० चे पत्रानुसार पाच वाहनांच्या अंदाजीत किंमती दिलेल्या आहेत. त्याप्रमाणे मॅके. इंजि. यांनी प्रस्तावीत केल्या त्या चार वाहनाची जाहीर लिलावाद्वारे नोटीस इ. काढून विक्री करण्यांत यावी व टाटा १२१० व सॅप्टीक टॅंक यांची वाहन नोंदणी इ. करून अंदाजीत किंमती उप प्रादेशिक परिवहन कार्यालय यांचेकडून निश्चित करून पुढील कार्यवाही करावी. तसेच अ.क्र.२ मधील इंडिगो.एम.एच.-१६,एम.एन.११११ वाहन विक्रीबाबत निर्णय घेणे उचित मंजूरीस्तव दि.२४/८/१०/ **अ**

मा.उपायुक्त साहेबः-**"अ"**प्रस्तावीनुसारआर.टी.ओ.यांच्या प्रमाणपत्रानुसार वाहन निर्लेखित करणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर निर्णयार्थ ठेवणे योग्य दि.२४/०८/२०१०/ **अ**

मा.आयुक्त साहेब :-**"अ"**मान्यR.T.O. ने दिलेल्या परवानगीनुसारच प्रस्ताव पाठवा. दि.२७/८/२०१०

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेबः-महानगरपालिकेच्या जुन्यावाहनांची परिवहन अधिकारी यांनी काढून दिलेल्या किंमती प्रमाणे जाहिर लिलावाद्वारे विक्री करणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. पवार बा.रे.:- लिलाव करावयाची किती वाहने आहेत.

मा.सभापती साहेब :- मॅकेनिकल इंजिनिअर यांनी माहिती सांगावी.

मॅके.इंजि.श्री.निकम पी.जे. :- ठरल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या जुन्या वाहनांची बंद पाकिटाद्वारे जाहिर दरपत्रके मागवून लिलावाद्वारे विक्री करणे कामी उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून एकूण सात वाहनांच्या किंमती काढून मिळणेबाबत कळविले असता परिवहन निरिक्षक यांनी म.न.पा.चे मोटार गॅरेज मध्ये दिनांक २२/७/२०१०रोजी समक्ष येवुन वाहनांची तपासणी करून त्यांचेकडील पत्र जा.क्र.२१४६दि.७/८/२०१०चे पत्रान्वये जुन्या पांच वाहनांच्या किंमती कळविण्यांत आल्या आहेत.परंतु म.न.पा.मोटार व्हेईकलविभाग जा.क्र.३१६ दि.३०/१/२०१० अन्वये पाठविलेल्या वाहन तपशील तक्त्यातील अ.क्र.१वाहन क्र डि.एम.आर.२०४०, टाटा १२१०मॉडेल खरेदी दिनांक १९९४हे अग्निशमन वाहन व अ.क्र.७ सेप्टीक टॅंक दुरूस्ती वाहनांची महानगरपालिकेमार्फत उपप्रादेशिक परिवहन विभागाकडेस नोंदणी न केल्यामुळे सरकारी किंमत काढण्यांत आलेली नसुन सदर तक्त्यातील किंमत न काढलेल्या वाहनाबाबत महानगरपालिका आपल्या स्तरावर निर्णय घेवु शकते.असे उपप्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत सांगण्यात आलेले आहे. सेप्टीकटॅंक दुरूस्ती वाहनचे आपण रजिस्ट्रेशन करत नाही परंतु त्यांनी त्यांचे रजिस्ट्रेशनची मागणी केलेली आहे.उपप्रादेशिक परिवहन अधिकरी यांनी वाहनांच्या किंमती (१) इंडिगो एम.एच.१६ एम.एन ११११ सरकारी किंमत रूपये ऐंशी हजार फक्त (२) एस्टीम एम.एच.१६ एन-१०१ सरकारी किंमत रूपये एक लाख पन्नास हजार फक्त

(३) एस्टीम एम.एच.१६ एन-२४२४ सरकारी किंमत रूपये पंच्याहत्तर हजार फक्त (४)ॲम्बेसिडर एम.एच. १६ एन २४ सरकारी किंमत रूपये चाळीस हजार फक्त (५) एस्कॉर्ट जे.सी.बी.एम.एच.१६ एन२६४ सरकारी किंमत रूपये सहा लाख फक्त याप्रमाणे किंमती काढून दिलेल्या असून वाहन क्रमांक एम.एच.१६ एम.एन ११११ ची खरेदी दिनांक १२/११/२००३ रोजी दाखविली असून सदर वाहन हे शासकीय नियमानुसार कमीत कमी दहा वर्षे पूर्ण झालेली नसल्यामुळे सदरचे वाहन लिलावामध्ये सध्या तरी घेता येणार नाही.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- महानगरपालिकेच्या जुन्या वाहनांच्या किंमती सरकारी किंमती पेक्षा लिलावामध्ये कमी आल्या तर काय करणार ?

मॅके. इंजि. श्री. निकम पी.जे. :- सरकारी किंमती पेक्षा जुन्या वाहनांच्या किंमती कमी आल्या तर सदर वाहनांचा फेर लिलाव करावा लागेल.

मा.सभापती साहेब :- अग्निशमन विभागाकडील वाहन क्रमांक डी.एम.आर.२०४० या वाहनाचे रजिस्ट्रेशन झालेले नसल्यामुळे सरकारी किंमत ठरवून मिळालेली नाही सदर वाहनांची लिलावामध्ये रूपये तीन लाखापर्यत किंमत येवु शकेल का ?

मॅके. इंजि. श्री. निकम पी.जे. :- अग्निशमन विभागाकडील सदरचे टाटा वाहन क्रमांक डी.एम.आर. २०४० चे हिस्ट्री रजिस्टर पहाता आजमितीस सदरच्या वाहनावर रूपये चार लाख सद्तीस हजार सातशे त्रेपन्न इतका खर्च झालेला असून जुन्या वाहनाच्या प्रचलीत दरानुसार अंदाजे किंमत रूपये अडीच ते तीन लाख तसेच सेप्टीक टँक वाहनाची या पूर्वी झालेल्या लिलावा मध्ये रूपये पंचवीस हजार किंमत ठेवण्यांत आली होती. परंतु सदर वाहनांची विक्री झालेली नाही.

मा.सभापती साहेब :- सेप्टीक टँक दुरूस्तीचे वाहनाची सरकारी किंमती रूपये २५,०००/- ऐवजी रूपये १८,०००/- ठेवण्यांत यावी म्हणजे त्यांची विक्री होवु शकेल.तसेच झालेली चर्चा विचारात घेता जुन्या वाहनाचे विक्री कामी प्रयत्न केले असता सरकारी किंमती मध्ये वाहनाची विक्री होवु शकणार नसलेने टाटा वाहन क्रमांक डी.एम.आर.२०४० या वाहनाची सरकारी किंमत रूपये एक ते दीड लाख एवढया रकमेपर्यत ठेवावी. वाहनांची विक्री तोंडी बोलीने लिलाव प्रक्रिया न राबविता बंद लिफाफे टेंडर पध्दतीने मागणी अजमावणेत यावी. कारण ओपन लिलाव प्रक्रिये मध्ये भाग घेण्यासाठी आलेले लिलाव धारकांमध्ये आपसात संगनमत होत असते.

मा.श्री.बारस्कर पो.ज. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा. अग्निशमन विभागाकडील वाहनाची सरकारी किंमत रूपये दीड लाख, सेप्टीक टँक दुरूस्ती वाहनाची सरकारी किमंत रूपये १८,०००/- फक्त व एम.एच.१६ एन-११११ चा वाहनाची ही उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी काढून दिले प्रमाणे सरकारी किंमत रूपये ८०,०००/- याप्रमाणे निश्चित करून विक्री करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. पवार बा.रे. :- टाटा वाहनाची सरकारी किंमत रूपये दीड लाख , सेप्टीक टँक दुरूस्ती वाहनाची सरकारी किंमत रूपये १८,०००/- व एम.एच.१६ एन-११११ चा वाहनाची ही उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी काढून दिले प्रमाणे सरकारी किंमत रूपये ८०,०००/- फक्त निश्चित करून विक्री करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- अग्निशमन विभागाकडील जुने वाहन क्रमांक डि.एम.आर. २०४० ची सरकारी किंमत रूपये एक लाख पन्नास हजार, सेप्टीक टँक दुरूस्ती वाहनाची सरकारी किंमत रूपये १८,०००/- फक्त व एम.एच.१६ एन-११११ चा वाहनाची सरकारी किंमत रूपये ८०,०००/- याप्रमाणे निश्चित करून महानगरपालिकेचे एकूण सात वाहनाची विक्री जाहिरातीद्वारे बंद लिफाफा पध्दतीने लिलावाद्वारे विक्री करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या खालील तक्त्यातील नमूद जुन्या वाहनांचे खालील किंमती प्रमाणे सरकारी किंमत निश्चित करून जाहिरातीद्वारे बंद लिफाफा पध्दतीने लिलावाद्वारे विक्री करण्यांस मंजुरी देण्यांत येत आहे.

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | मॉडेल | सरकारी किंमत |
|---|---|---|---|
| १ | टाटा १२१० | डी.एम.आर. २०४० | १,५०,०००=०० |
| २ | इंडिगो | एम.एच. १६ एन-११११ | ८०,०००=०० |
| ३ | एस्टीम | एम.एच. १६ एन-१०१ | १,५०,०००=०० |
| ४ | एस्टीम | एम.एच. १६ एन-२४२४ | ७५,०००=०० |
| ५ | ॲम्बेसिडर | एम.एच. १६ एन-२४ | ४०,०००=०० |
| ६ | एस्कॉर्ट जे.सी.बी. | एम.एच. १६ एन- २६४ | ६,००,०००=०० |
| ७ | सेप्टीक टँक | ----- | १८,०००=०० |

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-१०**

विषय क्रमांक - ६५ शनिवार दिनांक १८/९/२०१०

ठराव क्रमांक - ६५ शनिवार दिनांक १८/९/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बा.दे. दवाखाना व सुतिका गृह येथे डॉ. दिपाली अनभुले (शेळके) यांची दिनांक ०९/०८/२०१० पासून तीन महिन्याचे कालावधीकरीता दरमहा रूपये १५,०००/- चे मानधनावर वैद्यकीय अधिकारी म्हणुन कंत्राटी, करारानुसार केलेल्या नेमणुकीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** प्रेषक- आस्थापना प्रमुख , प्रति- नगरसचिव
आस्था. जा.क्र. वर्क-५३ दिनांक ९/९/१०

प्रस्तावना-विषय- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरिता तात्पुरत्या स्वरूपात डॉ.दिपाली अनभुले (शेळके) यांची वैद्यकीय अधिकारी पदावर कंत्राटी करार नुसार मानधनावर नेमणूकीस कार्योत्तर मंजुरी मिळणे बाबत.

सादर,

कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह जा.क्र. २६१ दि. ६/७/२०१० अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये "जा.क्र. आस्था/ कंत्राटी करार नेमणुक ३८० दिनांक ५/५/२०१० अन्वये ३महिन्याकरिता वैद्यकीय अधिकारी या पदावर कंत्राटी करार पध्दतीने नेमणूक करण्यांत आलेली होती. सदर आदेशानुसार दिनांक ६/५/२०१० रोजी कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे हजर झालेल्या आहेत. त्यांचा नेमणूकीचा कालावधी दिनांक ५/८/२०१० रोजी संपत आहे. डॉ. दिपाली अनभुले (शेळके) यांचे काम समाधानकारक आहे. पुर्ननेमणूक देणेस हरकत नाही." असे नमूद करून मा. मुख्य वैद्यकीय अधिकारी यांनी सुचित केलेले आहे. सदर प्रस्तावावर मा. प्र. आरोग्याधिकारी यांनी शिफारस केलेली आहे.

तरी मा.मुख्य वैद्यकीय अधिकारी,कै.बा.दे.दवाखाना यांचे उपरोक्त प्रस्तावानुसार कै.बा.दे. दवाखाना व सुतिका गृह येथे डॉ. दिपाली अनभुले (शेळके) यांची जा.क्र. आस्थापना /कंत्राटी करार नेमणूक १५८९दिनांक ९/८/२०१०अन्वये वैद्यकीय अधिकारी या पदावर कंत्राटी करारानुसार दरमहा रू.१५,०००/-(अक्षरी रू.पंधरा हजार)मानधनावर दिनांक९/८/२०१०पासून३ महिन्याकरिता केलेल्या नेमणूकीस व प्रस्तावास कार्योत्तर मंजुरी मिळणेसाठी आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :-कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह येथे डॉ.दिपाली अनभुले(शेळके)यांची कंत्राटी पध्दतीने मानधनावर वैद्यकीय अधिकारी म्हणून केलेल्या नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. पवार बा.रे. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बा.दे. दवाखाना व सुतिका गृह येथे डॉ. दिपाली अनभुले (शेळके) यांची दिनांक ०९/०८/२०१० पासून तीन महिन्याचे कालावधीकरीता दरमहा रूपये १५,०००/- (रूपये पंधरा हजार फक्त)चे मानधनावर वैद्यकीय अधिकारी म्हणुन कंत्राटी, करारानुसार केलेल्या नेमणुकीस कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर

नियमानुसार पुढिल कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १०**

विषय क्रमांक- ६६ दिनांक १८/०९/२०१०

ठराव क्रमांक- ६६ दिनांक १८/०९/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये आयात होणा-या जकातपात्र मालावर सन २०१०-२०११या आर्थिक वर्षाचे कालावधीसाठी जकात वसुली अभिकर्ता नेमणुकी साठी मागविण्यांत आलेल्या जास्तीचे निविदाकार यांनी वाटाघाटी अंती वाढवुन दिलेल्या निविदा दरास मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका. जकात विभाग दि.

विषय : सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षाच्या कालावधीसाठी जकात अभिकर्ता नेमणुकी बाबत मागविण्यात आलेल्या जाहीर निविदेबाबत...

सविनय सादर सन २०१०-११ करीता जकात कराचे संकलनाकरीता जकात अभिकर्ता नेमणुक करणेकामी अहमदनगर महानगरपालिकेमार्फत वर्तमानपत्रांतुन जाहिर निविदा सुचना चार वेळेस प्रसिध्दीस देऊन देखील प्रतिसाद न मिळाल्याने व मुदतीमध्ये जकात अभिकर्ता नेमणुक करणे आवश्यक असल्याने कार्यालयीन प्रस्ताव सादर केला असता, मा. स्थायी समिती ठराव क्र. ६२ दि. ३०/८/२०१० अन्वये खालिल प्रमाणे ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आलेला आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये सन २०१०-२०११ या कालावधीत आयात होणा-या जकात पात्र मालावर महानगरपालिका कर्मचा-यांमार्फत अथवा जकात अभिकर्त्यामार्फत पुढिल एक महिन्याचे कालावधीस्तव मुदतवाढ देवुन जकात वसुली करणे तसेच जकात ठेक्याची ठरविलेल्या देकार रकमे बाबत प्राप्त पत्रा विषयी कार्यालयाने सादर केलेल्या प्रस्तावावार सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार पुढील प्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

अहमदनगर महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या जकात संकलन अभिकर्ता मे. सहकार एजन्सी प्रा.लि. मुंबई यांना दिनांक ०१/०८/२००९ ते ३१/०७/२०१० या कालावधीसाठी मंजूरी केलेली एकूण देकार रक्कम व प्रशासकीय इमारतीचे बांधकामासाठी चे रकमेसहचे जकात वसुली दराचे प्रमाणात १ महिन्या करिता येणारी रक्कम रूपये ४,१२,१६,६६६/- (रूपये चार कोटी बारा लाख सोळा हजार सहाशे सहासष्ठ फक्त) एवढी रक्कम निश्चित करून मे. सहकार एजन्सी प्रा.लि. मुंबई यांना दिनांक ०१/०९/२०१० ते निविदा प्रक्रिया पुर्ण होई पर्यंत किंवा १ महिना यापैकी जो कमी कालावधी असेल अशा कालावधीसाठी मागील अटी / शर्ती नुसार जकात वसुलीकरिता १ महिन्याची मुदतवाढ देण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

तसेच सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षाचे कालावधीसाठी जकात अभिकर्ता नेमणूकीसाठी मा.सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक २ दिनांक २०/०१/२००९ अन्वये प्राप्त देकार रक्कम रूपये ४८ कोटी ०६ लाख व इमारत फंड रूपये १ कोटी ४० लाख या रकमेवर १०% (दहा टक्के) वाढवून येणारी रूपये ५२ कोटी ८६ लाख ६० हजार व यु.आय.डी.एस.एस.एम.टी. फेज-२ या योजने अंतर्गत पूर्ण करावयाच्या कामासाठी महानगरपालिकाच्या हिस्सापोटी रूपये १,५४,००,०००/-(रूपये एक कोटी चौपन्न लाख) याप्रमाणे देकार रक्कम निश्चित करणेस मंजूरी देण्यांत येत आहे. तसेच सदर प्रकरणी सभेचे कार्यवृत्त कायम होण्यांची वाट न पहाता पुढील कार्यवाही तातडीने करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येत आहे.

सदर ठरावानुसार दि. ३१/८/२०१० रोजी वर्तमान पत्रांमधुन पाचवी जाहीर निविदा सुचना प्रसिध्दीस देऊन विहीत नमुन्यात मोहोरबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या , निविदा सुचनेत प्रसिध्द केल्यानुसार निविदा दाखल करण्याची अंतिम तारीख दि. ७/९/२०१० रोजी ४.०० वा पर्यंत होती , व प्राप्त निविदा त्याच दिवशी शक्य झाल्यास ५.०० वा. मा. उपायुक्त अहमदनगर महानगरपालिका यांचे दालनामध्ये उघडण्याची प्रक्रिया करण्यात येणार होती त्यानुसार निविदा छाननी समीती समक्ष प्रक्रिया सुरु करण्यात आली , त्यावेळी खालील मा. अधिकारी , तसेच निविदाकार व त्यांचे प्रतिनिधी आणी मा. विविध वर्तमान पत्राचे पत्रकार उपस्थित होते.

१) मा. उपायुक्त साहेब म.न.पा. अहमदनगर
२) मा. मुख्य लेखा अधिकारी म.न.पा. अहमदनगर
३) मा. मुख्य लेखा परिक्षक म.न.पा. अहमदनगर
४) मा. सहाय्यक आयुक्त म.न.पा. अहमदनगर
५) जकात अधिक्षक म.न.पा. अहमदनगर
६) मे. सहकार ग्लोबल प्रा.लि.यांचे प्रतिनिधी
७) मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्श्चर लि.यांचे प्रतिनिधी
८) दै. सकाळ चे पत्रकार श्री. सुहास देशपांडे

वरील उपस्थितांचे समक्ष सिलबंद निविदा पेटी उघडण्यात आली असता,१) मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्श्चर लि. उल्हासनगर व २) मे.सहकार ग्लोबल प्रा.लि. मालाड.मुंबई या दोन निविदाकारांच्या सिलबंद निविदा प्राप्त झाल्या, सदर प्राप्त निविदा सिलबंद असल्याबाबत सर्वांना दाखविण्यात आले, व त्यांच्या स्वाक्ष-या घेण्यात आल्या,आलेल्या निविदा उघडण्यासाठी कार्यालयीन अहवाल दि.७.९.२०१०अन्वये मा.आयुक्त यांची परवानगी / मंजुरी घेण्यात आली, तदनंतर प्रथमता मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रकश्चर लि.यांचे निविदा उघडण्यात आली त्यांचे तांत्रीक लिफाफ्यामधील निविदाकाराचे पात्रतेबाबतच्या कागदपत्रांची मे.निविदा छाननी समितीमार्फत तपासणी करण्यात आली त्यामध्ये त्यांची निविदा तांत्रीकदष्ट्या पात्र असल्याचे समितीने ठरविले तदनंतर मे. सहकार ग्लोबल प्रा.लि.यांची निविदा उघडण्यात आली व त्यांचे तांत्रीक लिफाफ्यातील निविदाकाराचे पात्रतेबाबत तपासणी करण्यात आली , त्यामध्ये त्यांची निविदा तांत्रीकदष्ट्या पात्र असल्याचे समितीने ठरविले, सदर तपासणी मध्ये उक्त दोन्ही निविदाकारांनी आवश्यक असलेल्या सर्व पात्रतांची पुर्तता केलेली असल्याने सदर निविदाकारांचे लिफाफा क्र.२ उघडण्यात आले , त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र. | निविदाकाराचे नांव | निविदेतील देकार रक्कम |
|---|---|---|
| १) | मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्श्चर लि. उल्हासनगर | रु. ५२,८८,४०,०००/- |
| २) | मे. सहकार ग्लोबल प्रा.लि. मालाड , मुंबई | रु. ५२,९२,००,०००/- |

उक्त दोन्ही निविदाधारकांनी मा. शासनाचे युआयडीएसएसएमटी फेज २ या योजने अंतर्गत महानगरपालिकेच्या हिश्यापोटी रक्कम रु. १.५४ कोटी भरण्यास संमती दिलेली आहे.

वरील प्रमाणे प्राप्त निविदेपैकी मे. सहकार ग्लोबल प्रा.लि. मुंबई यांनी निविदेत नमुद केलेली देकार रक्कम रु. ५२,९२,००,००० /- ही महानगरपालिकेने निश्चीत केलेल्या देकार रक्कम रु. ५२,८६,६०,००० /- पेक्षा रु. ५,४०,००० /- जास्त आलेली आहे.

अहमदनगर महानगरपालिकेने सन २०१०-११ करीता जकात कराचे संकलन करण्यास जकात अभिकर्ता नेमण्याकरीता ५ वेळेस जाहीर निविदा प्रसिध्द केलेली आहे, सदरची वस्तुस्थिती विचारात घेता मे. सहकार ग्लोबल प्रा.लि. मुंबई यांची निविदा मंजुर करुन त्यांना कार्यारंभ आदेश देण्याबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनुसुची "ड" मधील प्रकरण ८ नियम ३५ व निविदेतील अटी व शर्ती नुसार जकात अभिकर्ता नियुक्ती करणे बाबत मा. स्थायी समितीची मान्यता घेणे करीता सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीपुढे निर्णयास्तव ठेवणे उचीत आहे.

तरी प्रस्तुत बाबत पुढील आदेशार्थ सविनय सादर.

जकात अधिक्षक यांचा अहवाल असे.

मुख्यलेखापरिक्षक श्री.खरात :- सन २०१०-२०११ साठी जकात अभिकर्ता नेमणेबाबत मे.कोणार्क इफ्रास्ट्रक्चर लि.उल्हासनगर, यांचे जकात देकार रक्कम रु.५२,८८,४०,०००/- व मे.सहकार ग्लोबल प्रा.लि., मालाड, मुंबई यांची जकात देकार रक्कम रु. ५२,९२,००,०००/- चे निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुसार महानगरपालिकेने निश्चित केलेल्या देकार रक्कमेपेक्षा मे.सहकार ग्लोबल प्रा.लि. मालाड मुंबई यांची रु.५,४०,०००/- इतक्या जादा रक्कमेने निविदा प्राप्त झाली आहे. तरी सन २०१०-२०११ करीता जकात अभिकर्ता यांची नेमणुक करणे बाबतचा विषय स्थायी समिती समोर चर्चेसाठी ठेवणेत यावा.

मुख्यलेखाधिकारी श्री.शेलार :- सन २०१०-२०११ करीता वरील प्रस्तावाप्रमाणे जकात अभिकर्ता नेमणुकीसाठीचा प्रस्ताव विषय चर्चेसाठी मा.स्थायी समिती सभेपुढे ठेवणेस हरकत नाही.

उपायुक्त साहेब :- प्रस्तावाप्रमाणे निविदा मंजुरीसाठी मा.स्थायी समितीकडे पाठविणेसाठी मान्यतेस्तव सादर.

मा.आयुक्त साहेब Hi ला वाटाघाटीस बोलवा.

सादर ,

सन २०१०-११करीता जकात कराचे संकलन करण्यास अहमदनगर महानगरपलिकेने निश्चीत केलेली देकार रक्कम रु. ५२, ८६,६०,०००/- नुसार अभिकता नेमणुक प्रक्रियेमध्ये मे.सहकार ग्लोबल प्रा.लि.मालाड, मुंबई यांचे निविदेमध्ये देकार रक्कम रु.५२,९२,००,०००/- सर्वाधीक आली असल्याने सदर निविदाकारास जकातीच्या देकार रक्कमेच्या वाटाघाटीबाबत जकात जा.क्र.१३१ दिनांक ९/९/२०१०अन्वये रोजी मा.आयुक्त,अहमदनगर महानगरपालिका यांचे दालनामध्ये बोलविण्यात आले असता,

सदर देकार रक्कमेबाबतच्या वाटाघाटीच्या चर्चेमध्ये निविदाकाराच्या वतीने श्री. विपुल के. लोटीया हे त्यांचे कंपनीचे वित्तीय अधीकारी उपस्थित होते , जकातीच्या देकार रक्कमेबाबत त्यांनी निविदेमध्ये नमुद केलेल्या देकार रक्कम रु.५२,९२,००,००० /- या रक्कमेमध्ये वाढ करुन देकार रक्कम रु.५३,०१,००,००० /- मान्य असल्याबाबत लेखी पत्र दिलेले आहे.

तरी मे.सहकार ग्लोबल प्रा.लि.मालाड,मुंबई यांनी वाढवुन दिलेली देकार रक्कम रु. ५३,०१,००,०००/- नुसार सन २०१०-११करीता जकात संकलनाचा अभिकर्ता नेमणुक बाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव व निर्णयाकरीता मा. स्थायी समितीपुढे सादर करण्याबाबत पुढील योग्य त्या आदेशार्थ सविनय सादर.

मुख्यलेखापरिक्षक श्री.खरात :- उपरोक्त प्रस्तावित केल्याप्रमाणे दर वाटाघाटीनुसार सन २०१०-२०११ साठी जकात देकार रक्कम रु.५३,०१,००,०००/- ( मुळ निविदेप्रमाणे जकात देकार रक्कम रुपये ५२,९२,००,०००/- अधिक वाढीव जकात रक्कम रु.९,००,०००/-) मंजूरीसाठीचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर चर्चेसाठी ठेवण्यात यावा.

मुख्यलेखाधिकारी श्री.शेलार :- **" अ "** प्रमाणे प्रस्ताव स्थायी समितीसमोर चर्चेसाठी ठेवणेत यावा.

उपायुक्त साहेब :- प्रस्तावाप्रमाणे मान्यता देणे योग्य. मान्यतेस्तव सादर.

मा.आयुक्त साहेब :- **" अ "** नुसार मा.स्थायी समिती पुढे ठेवावा.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

---*---

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

**मा.सभापती साहेब :-** ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

**मा.श्री.बारस्कर पो.ज.:-** जकात अभिकर्ता नेमणेकामीच्या अटी - शर्तीचे वाचन करावे.

**मा.सौ.ढोणे मा.सु. :-** मा.सभापती साहेब सदर जकातीचा ठेका सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षाचे कालावधीसाठी आहे म्हणजेच आपले महानगरपालिकेचे आर्थिक वर्ष ३१ मार्च २०११ रोजी संपते याचा अर्थ सदरचा ठेका दिनांक ०१/१०/२०१० ते ३१/०३/२०११ या कालावधी पर्यंतच आहे काय ? या सहा महिन्याचे कालावधीसाठी निविदेची देकार रक्कम रुपये त्रेपन्न कोटी एक लाख महानगरपालिकेस प्राप्त होणार आहेत आणि दरमहा रुपये (रुपये आठ कोटी त्र्यऐंशी लाख पन्नास हजार ) उत्पन्न मिळणार आहे असे समजायचे काय ? याबाबत खुलासा व्हावा.

**जकात विभाग वरिष्ठ लिपीक श्री.सारसर :-** सन २०१०-२०११ या वर्षाचे कालावधीसाठी देकार रक्कम रुपये ५२ कोटी ८६ लाख ६० हजार व यु.आय.डी.एस.एस.एम.टी.फेज-२ या योजने अंतर्गत पूर्ण करावयाच्या कामासाठी महानगरपालिका हिस्सा पोटी रुपये एक कोटी चोपन्न लाख अशी ठरविण्यांत आलेली असुन मा.स्थायी समितीच्या मंजूरीने जकात अभिकर्ता नेमणेची निविदा प्रक्रीया पूर्ण होई पर्यंत किंवा एक महिना या पैकी जो कमी कालावधी असेल त्या कालावधीसाठी जकात अभिकर्ता नेमणुकीसाठी मा.सभेने मंजूरी दिलेली होती. जास्तीचे निविदाकार यांनी वाटाघाटी अंती रुपये त्रेपन्न कोटी एक लाख व युआयडीएसएसएमटी फेज-२ या योजने अंतर्गत महानगरपालिकेचे हिश्शा पोटी रक्कम रु.१.५४ कोटी भरण्यांस मान्यता दिलेली असून त्याप्रमाणे महानगरपालिकेस उत्पन्न मिळणार आहे.

**मा.सौ.ढोणे मा.सु. :-** सदरचे जकात ठेक्याची मुदत कुठपर्यंत राहिल.

**मा.सहाय्यक आयुक्त श्री.देशमुख साहेब :-** जकात ठेका एक वर्षासाठी देण्यात येणार असून आपण वर्क ऑर्डर दिल्याचे तारखेपासुन एक वर्षासाठी जकात अभिकर्ता नेमणूकीची मुदत असणार आहे.

**मा.श्री.भोसले ग.पुं.:-** आपण जकात अभिकर्ता नेमणुकीची प्रक्रीया दोन महिन्यापासुन सुरु केली होती परंतु मुदतीमध्ये ती पूर्ण होवू शकली नाही. याकरीता पुढील वर्षी जकात अभिकर्ता नेमणेची प्रक्रीया तीन महिने अगोदर पासून सुरु करावी म्हणजे ती वेळेत पूर्ण होईल अडचणी येणार नाही.

**मा.श्री.पवार बा.रे. :-**ऑफिस रिपोर्ट नुसार आलेले जास्तीचे दरास मंजूरी देण्यात यावी.

**मा.श्री.बारस्कर पो.ज. :-** जकात अभिकर्ता यांनी वाटाघाटी अंती वाढवुन दिलेल्या जादाचे दरास मंजूरी देण्यात यावी तसेच सदर प्रकरणी सभेचे कार्यवृत्त कायम होण्याची वाट न पहाता पुढील कार्यवाही तातडीने करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

**मा.सभापती साहेब :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये आयात होणा-या जकात पात्र मालावर पुढील एक वर्षाचे कालावधीसाठी जकात वसुली अभिकर्ता नेमणूकी कामी मागविण्यांत आलेल्या जाहीर निविदा पैकी जास्तीचे निविदाकार यांनी वाढवुन दिलेल्या देकार रक्कम रु.५३,०१,००,०००/- (रक्कम रुपये त्रेपन्न कोटी एक लाख) चे व यु.आय.डी.एस.एस.एम.टी. फेज-२ या योजने अंतर्गत पुर्ण करावयाच्या कामासाठी महानगरपालिकेचे हिश्शा पोटी रुपये १,५४,००,०००/-(रक्कम रुपये एक कोटी चोपन्न लाख) या प्रमाणे निविदा दरास मंजूरी देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर. तसेच सदर प्रकरणी सभेचे कार्यवृत्त कायम होण्याची वाट न पहाता पुढील कार्यवाही तातडीने करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये आयात होणा-या जकात पात्र मालावर सन २०१०-२०११ या वर्षाचे कालावधीसाठी जकात वसुली अभिकर्ता नेमणूकीसाठी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तक्ता व ऑफिस रिपोर्टवर सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

जास्तीचे निविदाकार मे.सहकार ग्लोबल प्रा.लि., मालाड, मुंबई यांनी वाढवुन दिलेल्या देकार रक्कम रुपये ५३,०१,००,०००/- (रक्कम रुपये त्रेपन्न कोटी एक लाख फक्त) चे निविदा दरास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

सदर जकात वसुलीचा ठेका अभिकर्ता संस्थेस वर्क ऑर्डर दिल्यापासुन एक वर्षाचे कालावधीसाठी देण्यांत यावा.

पुढीलवर्षी महानगरपालिका हद्दीत जकात पात्र मालावर जकात वसुलीकामी जकात अभिकर्ता नेमणूकीसाठी जाहीर निविदा प्रक्रीया जकात ठेक्याची मुदत संपण्यापूर्वी तीन महिने अगोदर पासुनच सुरु करण्यांत यावी.

तसेच सदर प्रकरणी सभेचे कार्यवृत्त कायम होण्याची वाट न पहाता पुढील कार्यवाही तातडीने करण्यांत यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक : मा.श्री.पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

अनुमोदक : मा.श्री.बारस्कर पोपट जगन्नाथ सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.